<u>नि.दि.दा.क्र.१७३/२०१६</u>

**<u>उर्वरित उलटतपास प्रतिवादी क्र. १ ते १० तर्फे विद्वान विधिज्ञ श्री. व्ही. एस. काळे यांच्या मार्फत.</u>**

**१८.** हे म्हणणे खरे आहे की, १४ डिसेंबर २००० च्या दस्तानंतर ग्रामपंचायत चे कर, पाणीपट्टी मी आज पर्यंत भरलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, १४/१२/२००० नंतर ताबे साठेखत माझ्या नावे झाल्याबाबत मी ग्रामपंचायतला कळवलेले नाही. केडगांव येथे रजिस्टर्डचे ऑफिस असल्याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, ताबेखताचे साठेखत रजिस्टर्ड करणे आवश्यक असते याची माहिती मला होती. हे म्हणणे खरे आहे की, ताबे साठेखत रजिस्टर्ड करुन स्टॅम्प डयूटी भरावी लागते याची मला माहिती नव्हती. ताबे साठेखताला स्टॅम्प ड्यूटी भरावी लागते याची माहिती मला गेल्या तारखेला कळाली. हे म्हणणे खरे आहे की, वादातील कागदपत्रे खोटे असल्याबाबत दि. ३०/०३/२०१९ ते आज पर्यंत मी कोठेही तक्रार केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या साक्षीच्या प्रतिज्ञापत्रात माझे वय चुकीचे नमूद केलेले आहे. साक्षीदार म्हणतो टायपिंग मिस्टेक झालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, टायपिंग मिस्टेकची दुरुस्ती आज पर्यंत केलेली नाही.

**१९.** हे म्हणणे खरे आहे की, वाद मिळकतीची पुर्ण परिस्थीती मला माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या दुकान असलेली जागा अधी मोकळी होती आणि नंतर त्यावर बांधकाम करण्यात आलेले आहे. साक्षीदार म्हणतो अधी पासून त्याची परिस्थीत तशीच आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादातीत जागा जतनबाई यांनी १९७१ साली विकत घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, २००० च्या आधी पासून वाद मिळकत दुकान अस्तित्वात होती. हे म्हणणे खरे आहे की, कोर्ट कमिशनचे रिपोर्ट मला मान्य आहेत. हे म्हणणे खरे आहे की, निशाण २०८ अन्वये माहितीच्या अधिकारात प्रतिवादीला मिळालेली कागदपत्र मला मान्य नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे कागदपत्र चुकीचे आहेत हे मी आजतागायत ड्रग्ज डिपार्टमेंटला कळवले नाही.

डिपार्टमेंटला कळविल्याबाबतची नेमकी तारीख मी सांगू शकत नाही. साक्षीदार म्हणतो त्याचे कागदपत्रे पटलावर हजर केलेले आहेत.

**२०.** हे म्हणणे खरे आहे की, दि. ०४/१०/२०२२ ला ड्रग्ज डिपार्टमेंटने माझ्या नावे दिलेले पत्र मला मान्य आहे. दि. ०५/०३/२०२० रोजी ड्रग्ज डिपार्टमेंटने प्रतिवादीच्या नावे दिलेल्या पत्राबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०१/०८/२०१६ रोजी ड्रग्ज डिपार्टमेंटने माझ्या नावे दिलेले पत्र मला मान्य आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या पत्राच्या आधारे मी आज तागायत ड्रग्ज डिपार्टमेंटला उत्तर दिलेले नाही. मी पाठवलेले उत्तर पटलावर हजर केल्याचे माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीला माहितच्या अधिकारात कागदपत्रे देऊ नका असे पत्र मी ड्रग्ज डिपार्टमेंटला पाठवले होते. हे म्हणणे खरे आहे की, लायसन्स मिळण्यासाठी ड्रग्ज डिपार्टमेंटला सर्व कागदपत्रांची पुर्तता करावी लागते. हे म्हणणे खरे आहे की, माहितीच्या अधिकारा खाली मला प्राप्त झालेले सर्व कागदपत्र मी या केस कामी हजर केलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दि.१४/१२/२००० चे ताबे साठेखत मी दि. ०९/०६/२०११ रोजी दिलेल्या अर्जासोबत दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, सन २०११ ला पाठवलेले अर्ज व त्यासोबतचे कागदपत्र मी या केसकामी दाखल केलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१६ मध्ये ड्रग्ज डिपार्टमेंटला भाडेपट्टी साठेखत दाखल करण्यासाठी मी पत्र पाठवले होते. हे म्हणणे खरे आहे की, ड्रग्ज डिपार्टमेंटला लायसन्स मिळण्यासाठी आवश्यक कागदपत्र दाखल केलेली आहेत आणि ती सर्व कागदपत्र रेकॉर्डवर हजर केलेली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, ड्रग्ज डिपार्टमेंटला पत्र पाठवून रमेश मांडोत याला कागदपत्र देऊ नका असे कळवले होते.

**२१.** हे म्हणणे खरे आहे की, निशाणी २२१ व २२२ अन्वये मागणी केलेले कागदपत्र मी हजर करण्यास तयार नाही. ते कागदपत्र मुळतः खोटे आणि बेकायदेशीर असल्याने मला मान्य नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, दि.०८/०९/२०१० चा भाडे करार करण्यासाठी वापरलेला स्टॅम्प माझ्या नावे खरेदी केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या नावाचे खोटे स्टॅम्प विकल्याबाबत मी आजपर्यंत त्या स्टॅम्प वेंडर मारुती

किसन टेळे याच्या विरुध्द कायदेशीर कार्यवाही केलली नाही. हे म्हणणे खरे नाही की, भाडे करार झाला नाही याबाबत रमेश मांडोत याला लेखी कळवलेले नाही. साक्षीदार म्हणतो उत्तर नोटीसमध्ये सांगितलेले आहे आणि ते उत्तर पटलावर हजर केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, ते भाडे करार खोटे असल्याबाबत कोर्टाकडून डिक्लेरेशन मागितलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, ड्रग्ज डिपार्टमेंटला त्याने रमेश मांडोतला दिलेले ९९ कागदपत्र मला मान्य नाहीत याबाबत लेखी स्वरुपात कळवलेले नाही.

**२२.** दि.०१/०८/२०१६ रोजीचे ड्रग्ज डिपार्टमेंटच्या पत्राला मी उतर दिलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, निशाण २१६ दि. ३०/०९/२०२१ रोजी दाखल केलेले कादपत्र आणि त्यामधील ड्रग्ज डिपार्टमेंटला रमेश मांडोत याच्या विरुध्द केलेल्या तक्रारीबाबतचा मजकूर मला मान्य नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०८/०६/२०१६ रोजी माहितीच्या अधिकारा खाली दिलेल्या कागदपत्रातील मजकूर खरा व बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०८/०६/२०१६ रोजीचे कागदपत्र चुकीचे आहेत याबाबत मी ड्रग्ज डिपार्टमेंटला आज तागायत कळवलेले नाही.

<u>उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात येत आहे.</u>

श्रवणोत्तर स्वीकृत.
SD/-

**(एस. ए. विराणी)**

दिनांकः- २८.०२.२०२५. सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,दौंड, जि. पुणे.